ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# जगप्रसिद्ध लोणार येथील शिलालेखीयसंदर्भ साधने



डॉ. व्यास सी.पी.
के.के.एम. कॉलेज, मानवत जि परभणी

**प्रस्तावना:**

सुमारे पन्नास हजार वर्षापूर्वी निर्मित उल्काघाती विवर सरोवराचे ब्लॅक बेसाल्ट खडकातील खा-या पाण्याचे सरोवर असलेले लोणार हे जागतिक महत्त्वाचे एकमेव नैसर्गिक अपघात जनित लाभाचे स्थळ होय. हयाची माहिती विविधांगी स्वरूपाची आहे. **20** व्या शतकातील विद्वानांच्या अभ्यासामुळे येथील नैसर्गिक निर्मिती जी पूर्वी पौराणिक व धार्मिक स्थळ या रूपातच पारंपारिक ठेवा या स्वरूपात सुरक्षित होती, तिला नवीन दिशा मिळाली. नव्या वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोड लाभून हे स्थळ सर्वांच्या नजरेत आले. येथे धार्मिक यात्रोकरू सोबत वैज्ञानिक दृष्टि ठेवणारे अभ्यासक, कला प्रेमी, सांस्कतिक वारसा अभ्यासणारे, निसर्गप्रेमी व हौसी, इतिहासतज्ञ, खगोतज्ञ, भूगर्भूज्ञ, भूगोलवेत्ते इ. चे आगमन सुरू झाले. या सर्व विषयांच्या विश्लेषणात्मक अभ्यासापेक्षा वेगळे पुरातत्त्वीय विश्लेषण करण्याचा हेतू ठेवून स्वतंत्र व व्यापक अभ्यास होणे गरजेचे आहे.

लोणार या भूमीवर प्रथमतः ऐतिहासिक व पुरातत्त्वीय संदर्भास सातवाहन कालीन संस्कृती बहरली असे म्हणावे लागेल. कारण लोणारची वस्ती सातवाहन कालीन मानवाची होती. येथील विस्तीर्ण पसरलेल्या पांढ-या मातीच्या वरील वर्तमान वस्तीला पाहता, येथे उपलब्ध होणा-या पुराव्यांच्या आधारे हे ठळकपणे मांडता येते. लोणार येथील दैत्यसूदन मंदिराच्या आवाराच्या अवशिष्ट पडक्या भिंतीच्या उभ्या असलेल्या मातीतून लालरंगाच्या भांडयावर लाल पॉलिश केलेल्या मृद भांडीचे तुकडे मिळाले आहेत. काळया मातीच्या भाजलेली खापरे व काळया रंगाच्या ॲगेट पासून निर्मित केलेला मणी आढळला.

वाकाटक कालीन धाटणीची (छटेची) दगडी कोरीव कामाची यक्ष मूर्ती लोणारच्या दैत्यसूदन मंदिरा बाहेरील मुलींची शाळा व आण्णासाहेबांचा वाडा या दरम्यान लोणारच्या नळयोजनेच्या पाइून लाइनच्या खोदकामात 40 वर्षापूर्वी प्राप्त झाली आहेत. ते दैत्यसूदन मंदिरात ठेवली आहे. दोन ते अडीच फुटाची ही भुरकट दगडाची मूर्ती होय. यानंतर विष्णुकुंडिन बदामी चालुक्य आणि राष्ट्रकूट यांच्या काळातील अवशेषांचा थांग पत्ता नाही. या मागे येथील गावक-यांनी वेळोवेळी प्राप्त होणारे पुरावे जतन न करणे व उदासीन राहणे ही कारणे संभवतात. फक्त कल्याणी, चालुक्य काळातील पुष्करणी लोणार येथे उपलब्ध आहे. येथील पुष्करीणी (आजवर लिंबी बारव म्हणून ज्ञात) चे देवकोष्ठ उठावदार व सुंदर कोरणीचे आहे. या देवकोष्ठा समोरील मध्य भागा वरील डिझाइन नांदेड जिल्हयाच्या देगलूर तालुक्यातील होट्टल गावच्या शिव मंदिराच्या सभा मंडपा वरील

डिझाइनशी जुळणारे आहे. या वरून ते कल्याणी चालुक्य कालीन होय. येथे अष्टदिकपाल दर्शविले आहेत. तसेच ब्रह्मा, इंद्र, अग्नि, वायु, अश्विनीकुमार इ. देवता आहेत. ही पुष्करिणी पूर्वी स्नानासाठी उपयोगात आणत असत. ही पेय जलाची व्यवस्था नव्हती. पश्चिमे कडील तोंड केलेले बारवेतील पश्चिमे कडील मुख्यदेवता कोष्ट पश्चिममुखी आहे. त्या जवळ शिवाचे मंदिर होते. ही शिव पुष्करणी गावकुसा बाहेर आहे. जवळील शेतात वालकडे आड नावाच्या लोकांची मृतक स्मारके ही आहेत. या पुष्करिणीला लोक मानसिक आठवणीत लिंबी विहीर म्हणतात (लिंबी कळवातिनीच्या या निर्मितीशी संबंध सांगतात या उल्काघाती विवर वलयाची आतील सर्व मंदिरे श्री महात्मा चक्रधर आल्यावेळी होती. ते लोणारला दोन वेळा शंकर व गणेश मंदिर रामगया मंदिर, वाघ मंदिर, मोरे मंदिर महादेव मंदिर आणि कमलजा अर्ध वलया पर्यंत आहेत. आदिम देवतेचा तांदळा असला तरी यादव शैलीच्या मंदिरात विराजमान आहे. रामकुंड, अग्नितिर्थ, यमतिर्थ व पुढे कमलज समोर लक्ष्मीतीर्थ, अबंरखाना जवळ प्रभास तीर्थ आणि मंुगळया महादेव मंदिराजवळ वरूणतीर्थ देशमुख मंदिरा जवळ वायुतीर्थ, चोपडयाचे महादेव मंदिरा जवळ सोमतीर्थ, पुढे दरग्या जवळ मंदिर व सरोवरात कपिला संगम तीर्थ, वेदशाळा इ. स्थाने आहेत. धारेजवळ श्री नृसिंह, रेणुका, (श्रीराम), गणपती, कार्तिकेय, महादेव, नारदेश्वर, हाटकेश्वर, पापहरेश्वर मंदिर या मंदिराचा काळ इ.स.**1280** नंतरच्या यादव रामचंद्र देवाच्या आगमना नंतरची भर होय. उत्तरे कडील तोंड असलेले हाटकेश्वर शिव मंदिर असून येथे चक्रधर राहीले होते. या तिर्थ आणि मंदिरांना यादव सत्तेचा आधार असावा. कारण असे कि दैत्यसूदन मंदिराजवळील शिलालेख इ.स.**1241** चा कन्हेरदेव आणि त्रिदेवाच्या मंदिरातील रामचंद्रदेव यादव सम्राट याच्या शिलालेख मधील उल्लेख आणि लोक कथेनुसार सिंघण राजाची छत्राी या यादव घराण्याच्या आर्शिवादामुळे हे उल्काघाती सरोवर तिर्थ स्वरूपाचे रूप घेऊ शकले आहे. दैत्यसूदन मंदिर सुरवात सम्राट सिंघणाच्या भेटीनंतर व्यापारी श्रेणी व राज सत्तेच्या माध्यमातून मंदिराची भर एक शतक चालू होती. हनुमान इतर देवता थोडया उत्तर कालीन आहेत. रामगया मंदिरातील 'श्री राममंदिर करविला दासुगी नवसा' या व्यापारी श्रेणी संघाचा प्रमुख यांनी द्रव्य पुरवले आहे. सीधी कुमारू व माडीतोराम शिल्पीचे प्रवेशद्वाराच्या तोरणद्वारा खाली बाहेर जागी मंदिरात उल्लेख मिळतात. तसेच उत्तरेच्या सभागृहाच्या तोरण शाखेच्या उंबरटयावर लेख देवनागरी लिपीत आहे. धारेच्या दगडी फरसीवर सीधीकुमारू, शागीसने, अग्नीगोत्रा, अग्नीगोत्राी अशी पंधरा दगडावर नोंद दिसते. या नावा बरोबर हात जोडलेली रेखाचित्रो आहेत. श्री दैत्यसूदन मंदिर हे श्री चक्रधर यांच्या वास्तव्याने पुनीत झालेले आहे. त्यामुळे हे मंदिर त्या पूर्वी पूर्ण झालेले होते. इ.स.**1185** ते **1200** काळात हे मंदिर निर्माण झाले असावे. दैत्यसूदन मंदिरावरील काही प्रतिमा वरून बहुतेक बलराम, रोहिणी कृतिका भार्यासह आणि मिथून शिल्पामुळे आणि सूर्यदेवताच्या ग्रीक बुट घातलेल्या प्रतिमे वरून या मंदिरातील मुख्य आचार्य व त्यांचे शिष्यगण पंचरात्रा पद्धतीची उपासना प्रमाण मानून तंत्रा मार्गाचे साध्य मानूत आणि त्याच पद्धतीने दैत्यसूदन विष्णुची उपासना करित होते. या मातीच्या आवारात अहमदनगर निजामशाही पूर्वीची कांकणे मिळतात. म्हणून येथील मातीचे आवार बहामनी कालोत्तर असावे. या आवाराच्या प्रवेशद्वारा जवळ बारव आणि दोन बुरूज ही लोकांनी पाहिलेले आहेत.

लोणार (सरोवर) या स्थळी अनेक शिलालेख आहेत. शिलालेख पहिला ब्रह्ममंदिरात (त्रिदेव मंदिर) असलेल्या शिलालेखाचा उल्लेख लोणारचे व विदर्भाचे आधुनिक काळातील सर्वश्रेष्ठ इतिहासकार स्व.यादव माधव काळे यांनी व-हाडचा इतिहास (इ.स.**1924**) या ग्रंथात केला आहे व त्यांच्या वाचनाची गरज मांडली जी **21** व्या शतकाच्या आगमना पर्यंत ही पूर्ण झालेली नाही. कारण तो शिलालेख घासला गेला असून अनेक अक्षरांची व शब्दांची संगती लागत नाही. हा शिलालेख **1924** पूर्वी पापहरेश्वराच्या धारा प्रवाहाच्या गुफावजा चैकटीच्या वरील भागांवर होता असे ही काळेंनी नमूद केले आहे. त्याचे थोडे फार

वाचन करण्याचा प्रयत्न झाला पण त्यातून नेमका अर्थ लागत नाही. हा शिलालेख जवळपास **10** इंच रूंद व **3**फुटाहून लांब असावा. त्याचा वरचा तुकडा ही नष्ट झाला आहे. 2.सीता नाहणी येथील प्रसिद्ध कुमारेश्वर (शिव) मंदिराच्या सभागृहातील अंतराळा कडील भोग मंडपाच्या मध्यभागी असलेल्या दगडी खांबावर मधोमध चैकोनात कोरलेला आहे. तो ही कालौघात घासला गेला आहे. मानवीय विनाशक वृत्तीमुळे हा महत्त्वाचा ठेवा ही पूर्णतः वाचणे कठिण आहे. हा शिलालेख संस्कृत भाषेत असून जवळपास **11** ते **12** इंच लांबी रूंदीत कोरलेला आहे. या मंदिरात श्री चक्रधर स्वामी बसले होते व त्यांची यादव नरेश कन्हरदेव याने भेट घेतली होती. या मंदिराची मूळ उभारणी त्याहून प्राचीन ठरते. म्हणजे **13** व्या शतकापूर्वीच्या काळातील मूळचे मंदिर असून त्याची उभारणी राष्ट्रकूट काळा पर्यंत मागे जाते. त्या शिलालेखातील माहितीचा थोडाफार कळलेला अर्थ- **1.**श्री गणेशाय नमः **2.**शिवानाम धर्म कीर्तन प्राज्ञा **3.**कुमारेश्वर देवा **4.**कृति संकल्प **5.**दामोदर **6.**शिल्पीकृती संवत **800 (?) 1800** यातील सर्व शब्द स्पष्ट झाले नाहीत. यातील आकडा **800** शक आहे का**?** हे नेमके सांगणे कठीण आहे. 3.लोणार विवर वलयाच्या पूर्वेकडील डोंगराच्या पायथ्याशी रामगया मंदिर संकुलाचे सुंदर व रमणीय बांधकाम आहे. या मंदिराच्या उत्तरेकडे एक शिव मंदिर भग्नावस्थेत आहे. श्री रामचंद्रानी येथे शिवलिंग स्थापन केले अशी जनमान्यता आहे. शिव मंदिराजवळ श्री रामकुंड आहे. जे सद्या कोरडे आहे. याच्या जवळच श्रीराम मंदिर आहे. त्या समोर नंतरच्या काळातील श्री हनुमान मंदिर ही आहे.श्री राममंदिराचे बांधकाम झालेल्या डागडुजीमुळे श्री कमलजा (श्री लक्ष्मी)च्या मंदिरा प्रमाणे चांगल्या स्थितीत आढळते. हे मंदिर उत्तर यादवकालीन व **14** व्या शतकापूर्वीचे म्हणता येईल. येथील सभागृहाच्या तीन दिशेला दगडी चैकटी असून लाकडी दारे होती. आतून लाकडी अडगळ लावण्याची सोय दिसते. त्यावरून हे मंदिर उत्तर यादव कालीन म्हणता येईल. कला व निर्मिती व द्वारशाखेवरील श्री गणेश ही यादव शैलीकडे ध्यानाकर्षण करतात. मंदिराच्या सभागृहाला तीन प्रवेशद्वारे आहेत. क पश्चिकडील मुख्य प्रवेश द्वाराच्या वरच्या पायरी जवळ मानवी रेखाकृती दगडी फरशीवर कोरली असून त्या शेजारी दोन नावे ही कोरली आहेत. त्यावर माडितोराम व त्या खाली दासुगी असे लिहिले आहे. ख मंदिराच्या पश्चिम प्रवेश द्वाराच्या दगडी चैकटीच्या डावीकडील खांबावर जवळपास चार ते साडे चार फुट उंचीवर लेख कोरलेला आहे. त्यात ‘’श्री राम मंदिर बांधविला दासुगी नवसा” असे लिहिले आहे. ग तिसरा लेख मंदिरातील सभागृहाच्या उत्तर द्वाराकडील फरशीवर आहे तो अस्पष्ट झाला आहे. पण इतर नावावरून त्याची संगती लागते की त्यात पूर्वीचे नाव सीधीकुमार असावे. घ चौथा लेख उत्तर प्रवेशद्वाराच्या चैकटीच्या खालच्या दगडी भागावर आहे. तेथे उभी रेखाकृती असून जवळच्या प्रतिमा लेखात ’सीधी कुमारू‘ हे नाव कोरलेले आहे. यावरून या मंदिराच्या निर्मितीला जबाबदार असलेल्या दोन व्यक्तींचा उल्लेख स्पष्ट होतो तो म्हणजे बांधण्यास अर्थ सहाय्य करणार धर्मप्रेमी व्यक्ती दासुगी असावा तो धर्म यात्रो निम्मित येथे आला होता. त्याने ठरविल्या प्रमाणे हे बांधकाम करविले. तो व्यापारी असला पाहिजे. त्याच्या या कार्याला मदत करून प्रत्यक्ष बांधकाम करवून घेणारा स्थपति व कलाकार या नात्याने ‘सीधी कुमारू’ (सिद्धी कुमार) हे नाव आले आहे. त्या सोबत माडितो राम हे नाव आले आहे. एक तर हा दुसरा मदत करणारा कलाकार (किंवा कोरक्या) होय. नसता ’माडितोराम‘ हा शब्द घासल्यामुळे वेगळा वाटत असावा. तेथे मंदिर रामाचे असे असावे जे दासुगीने बांधविले. दासुगी**,** माडितोराम**,** सीधीकुमारू इ. नावे कन्नड घाटणीची वाटतात. कल्याणीच्या चालुक्य भूमीकडील हे लोक असावेत. हिप्पळगाव जवळील गणेशवाडी (ता.निलंगा जि.लातूर येथील भीमनाथ यशस्तीत भीमनाथाने मेहकर (मेघंकर) येथे त्रिदेवांची स्थापना करून धर्मशाळा बांधविल्याची नोंद आहे. म्हणजे परिसरात महानुभाव संप्रदाय प्रवर्तक श्री चक्रधरा प्रमाणे**,** यादव नरेश कन्हरदेव**,** एका यादव राजाचा (प्रधानमंत्रा ी) भीमनाथ व व्यापारी**,** धर्मप्रेमी यात्रोकरू सतत येत असत. त्यामुळे हे बांधकाम झाले असणार. 4. श्री दैत्यसूदन मंदिर (श्री विष्णु मंदिर) चे विशाल मंदिर आहे. या मंदिराची निर्मिती **85** ग **105**

फुटाच्या विशाल भूमीवर झालेली असून मंदिराची दगडी फरशी असलेले आवार **200** ग **250** फुट एवढे विस्तीर्ण आहे. या मंदिरावर लेख असावेत. पण समोरचा उत्तम कोरणीचा सभागृहाच्या अर्धमंडप व तीन प्रवेश द्वारांचा भागही पाडला गेला जो पुन्हा विटांनी बांधलेला आहे. या वरून काही लेख नष्ट झाल असावेत. मंदिर सफाई झाल्यामुळे या लेखाचा बराचा भाग स्पष्ट दिसू लागला. त्यामुळे आम्ही साधने नसता नाही इतर प्रयोग करून शिलालेखाचा वाचनाचा प्रयत्न केला. हा लेख पायरीच्या उभ्या भागावर असून तो दोन दगडावर जवळ पास चार ते साडे चार फुटा पर्यंत कोरलेला आहे. प्रारंभी श्री गणेश, मोर इ.ची कोरणी अस्पष्ट झालेली आहे. पहिली ओळ दोन दगडावर आहे पण अक्षरे खूपच अस्पष्ट असून वाचता येत नाहीत. खालची ओळ वाचता आली त्या नुसार “शक **1163 (इ.स.1241)** कन्हरदेव मंदिरास आला प्रदत्त” या मजकुरापूर्वीचा भाग कळत नाही. यातून एक महत्त्वाची नोंद मिळाली ती म्हणजे यादव कुलतिलक नरेश कन्हरदेव लोणारला येवून गेले. महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्री चक्रधर या मंदिर चैकात बसले होते. बाजूला वायव्येतील (आज नष्ट) मढून राहिले होते. राहिल्याच्या नोंदी प्रमाणे (लीळा चरित्रा,स्थान पोथी, रत्नमाला स्तोत्रा इ.) यादव नरेश कन्हर देव ”सोमवारिया कारणे रावो कुंडासि आला’‘ लोणारची धार गंगा सोमवती अमावस्या, अयन, ग्रहण, व्यतियान सिंहस्थ, श्रावण, आदिकमास, दिवाळी, पोर्णिमा इ. प्रसंगी स्नान-दानाने प्राचीन काळा पासूनचे महत्त्व आहे. लोणार म्हणजे ’विरज क्षेत्रा’ व ‘विष्णु गया’ स्थान हे सर्व लक्षात घेता लवणासुर वध कर्ता श्री विष्णुच्या दैत्यसूदन मंदिराला कन्हरदेवाची भेट व देवदर्शनाची भूमिका स्पष्ट होते. तसेच हे “विदर्भातील सर्वोत्कृष्ट व सर्वांग सुंदर मंदिर” त्या काळी पूर्वीचे ठरते व ते पूर्णावस्थे पर्यंत बांधलेले होते. येथे पूजाअर्चा होती. रथयात्रा (परिक्रमा मार्ग अजून आवाराला लागून आहे) व पूर्वेकडील मुख्य प्रवेशद्वारातून येणारी सूर्य किरणे श्री दैत्यसूदनाच्या मुख्य प्रतिमेवर पडत होती. अशी ही सर्व व्यवस्था पाहता धर्म व शिक्षणाचे पीठ असलेले हे देवस्थान होते. येथे राजा ते रंक, संत-महंत सर्वच असत. जगन्नाथ पंडित, गोपीनाथ पंडित इ. चे लोणारला वास्तव्य होते. ज्यांच्या अनुज्ञेने नारायणाचे मंदिर बांधले या संदर्भातील शिलालेख भांदकथेचे आहे. त्याचा काळ **12** व्या शतकाचा आहे. या मंदिराच्या पूर्वीच्या दगडी जगतीचे बांधकाम नष्ट झाले व नंतर **450** वर्षापूर्वी सद्या उभ्या दिसणा-या पडक्या पांढ-या प्राचीन मातीच्या भिंतीचे आवार तयार केले गेले. दक्षिणे कडे धर्मशाळा ही होती ती नष्ट झाली. 5.नगराच्या पश्चिमेस विशाल बांधकामाचे अखंड विरज धार (गंगा भोगावती, कपिला तिर्थ, पाताल तीर्थ) संकुल आहे. तेथे **50** हजार वर्षापूर्वी निर्मित उल्काघाती विवरा प्रमाणे प्रवाहित झालेली अखंड जलधारा एका विशाल दगडी कुंडात **11** फुट उंची वरून पडते. येथील धारेवर श्री स्वामी सच्चिदाश्रमांनी काशी विश्वेश्वराचे मंदिर बांधले. त्यामागे तिस-या मजल्याच्या उंचीवर श्री दैत्यसूदन (श्रीविष्णु) द्वारा ‘लवणासुर वधाची मूर्ती’ असलेले मंदिर आहे. शेजारी पश्चिमेस रामेश्वर मंदिर व भग्न त्रिदेव मंदिर असावे. कुंडाला पश्चिम, पूर्व व दक्षिणे कडून विशाल पाय-या आहेत. कुंडाच्या सर्व बाजूंना दगडी फरशी व संरक्षक भिंती आहेत. पूर्वेस ब्रह्मकंुड असून त्यावर श्री नृसिंह, श्री राजुर गणपती (नंतरची स्थापना) श्री रेणुका (मूळचे श्री राम मंदिर), श्री शिव मंदिर, श्री कार्तिकेय मंदिर, श्री नारदेश्वर मंदिर संकुलाचे बांधकाम आहे. त्या पलीकडे हाटकेश्वराचे उत्तराभिमुख शिव मंदिर व नारद तपश्चर्या स्थान आहे. धारेवरील ही श्री चक्रधरांची अनेक स्थाने आहेत. तर हाटकेश्वर वास्तव्याचे स्थान आहे. धार संकुलाची बरीच मंदिरे नागपुरकर भोसले व सिंदखेडचे जाधवराव यांच्या काळात पुन निर्मिती केलेली आहेत ब्रह्मकुंडा समोरील व दक्षिणे कडे वळतांना दगडी फरशीवर पुन्हा रामगया प्रमाणे मानव रेखाकृती (हात जोडलेल्या) आहेत. त्या कुंडाकडे जाताना व बाहेर येताना, सरोवर आणि रामगया कडे जाताना दाखविल्या आहेत. हया दिशानिर्देशक खुणाच आहेत. या दगडी फरशीवर पंधरा ठिकाणी नाव निर्देश आला आहे. त्यात सीधी कुमारू व सीधी कुमारू अग्निगोत्राी असे उल्लेख वाचता आले आहेत. या वरून यादवांच्या काळातील ही मूळ निर्मिती ठरते. सिंदखेडराजाचे जाधवराव व नागपूरकर भोसले कालीन

चिटणीसांनी काही मंदिर दुरूस्ती व बांधकाम केले. अहिल्याबाईंचे अन्नछत्रा ही धारेच्या वरील उत्तर बाजूस गावालगत उंचवटयावर आहे. एकंदर नंतरच्या काळात चुना-विट बांधकाम झाले आहे. मात्रा ते **300** ते **125** वर्षापूर्वी पूर्वी पर्यंतचे होय. लोणारच्या ब-याच बांधकामात आलेली नावे कोरक्या किंवा स्थपतीचे निर्देशक होतात. या परिसरात आणखीन संशोधन होणे गरजेचे वाटते. ज्यातून आणखीन माहिती प्राप्त होऊ शकते.

**संदर्भ-**

1. कोलते वि.भि., 1987, महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, प्रकाशक सचिव महाराष्ट्र राज्य संस्कृति मंडळ, मुंबई, पृ 150-165
2. व्यास पी जी., 2000, सर्वांग परिचय जगप्रसिद्ध लोणार: संस्कृति प्रकाशन, औराद शहाजानी, पृ.73-119
3. इतिहास संशोधक श्री समुद्रगुप्त पाटील व डॉ प्रकाशचंद्र व्यास यांच्यासह स्थळ भेट व शोध दि 06-08 जून 2005
4. Morvanchikar R.S., Leture Delivered at Lonar, Date 18/10/2000